साप्ताहिक

भारत सरकार मान्यताप्राप्त

# अनंत विचार

संपादक : सचिन हरी आदापुरे मो.नं.९८५००२७६४३

WEEKLY
ANANT VICHAR
वेब पोर्टल | युट्युब न्यूज नेटवर्क
Editor : SACHIN HARI ADAPURE
CELL NO - 9850027643
nageshadapure1978@gmail.com

अनंत विचार चा अंक WHATSAPP वर वाचण्यासाठी आपला WHATSAPP नंबर व नांव वरील नंबरवर SMS करावा

वर्ष : दुसरे | वार:मंगळवार | दि.२३ एप्रिल २०२४ | किंमत : ५ रुपये | पाने : ४ | अंक: ३८ | R.N.I.No.-MAH-MAR-2022/83591 | PPR/83/2023-2025


## अभिजीत पाटील व भगिरथ भालकेंची लोकसभेआडून विधानसभेची तयारी

पंढरपूर - पंढरपूर विधानसभा मतदारसंघात एकमेकांचे प्रतिस्पर्धी असणारे विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील व माजी अध्यक्ष भगीरथ भालके हे दोघेही सध्या सोलापूर लोकसभा मतदारसंघातील काँग्रेस उमेदवार आ. प्रणिती शिंदे यांचा प्रचार करत असले तरी त्यांच्यातील राजकीय संघर्ष पाहता समांतर प्रचार यंत्रणा राबविल्या जात असल्याचे चित्र आहे.

आ. शिंदे यांची उमेदवारी जाहीर होण्यापूर्वीच ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांनी मतदारसंघात मोर्चेबांधणी केली होती. त्यावेळी त्यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे या भागातील नेते अभिजित पाटील यांना बरोबर घेतले होते. पंढरपूर व मंगळवेढा भागात संवाद मेळावे घेण्यात आले होते. पाटील यांनी प्रणिती शिंदे यांच्या गावभेट दौऱ्यातही सहभागी होत प्रचार सुरू केला होता.

अभिजित पाटील यांच्यावर सोलापूर लोकसभा मतदारसंघाबरोबरच माढ्यात ही शरद पवार यांनी अनेक जबाबदाऱ्या दिल्या होत्या. यामुळे पाटील हे सोलापूर



व माढा लोकसभा मतदारसंघात सतत दौरे करत आहेत. माढ्यातील अनेकांचे पक्षप्रवेश त्यांनी घडविले तर अकलूजच्या धैर्यशील मोहिते पाटील यांनी भाजपाला सोडचिठ्ठी देत शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश केल्यानंतर प्रत्येक कार्यक्रमाला अभिजित पाटील हे उपस्थित आहेत. जोरदार भाषण करत आहेत.

सुशीलकुमार शिंदे यांनी सोलापूर लोकसभेचे गणित सोपे करण्यासाठी मंगळवेढा व पंढरपूर भागात ताकदवान असणाऱ्या भालके गटाला आपल्यासोबत घेण्याचा निर्णय घेतला व भगीरथ भालके यांच्याशी चर्चा केली. भालके हे सध्या बीआरएस पक्षात काम करत आहेत. स्थानिक राजकारणात त्यांचा गट ताकदवान असून पोटनिवडणुकीत त्यांनी एक लाख सहा हजार मतं घेतली आहेत.

पंढरपूरच्या राजकारणात पाटील व भालके यांच्यात राजकीय संघर्ष असून अभिजित पाटील यांनी भालके यांना विठ्ठल कारखान्याच्या निवडणुकीत पराभूत केले आहे. यानंतर विधानसभेची तयारी या मतदारसंघात सुरू केली आहे.

आता पाटील व भालके हे दोघेही काँग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांच्यासाठी प्रचार करत असले तरी यंत्रणा वेगवेगळ्या राबवताना दिसत आहेत. भगीरथ भालके यांनी गावभेट दौऱ्याबरोबरच मोठ्या सभा ही घेण्यास सुरूवात केली असून कालच कासेगावमध्ये मोठी सभा झाली. आणखी सभांचे त्यांनी आयोजन केले आहे.

अभिजित पाटील यांनीही मंगळवेढा भागात दौरे सुरू केले असून नुकतीच त्यांनी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी पक्षाची बैठक घेवून प्रचाराचे नियोजन केले आहे. येत्या विधानसभा निवडणुकीसाठी पाटील व भालके हे दोघेही इच्छुक आहेत. त्यांनी लोकसभेआडून आमदारकीच्या निवडणुकीची तयारी जोरदार सुरू केली आहे. यासाठीच त्यांना स्वतंत्र यंत्रणा लावणे गरजेचे होते.

## ऊन वाढत असल्यामुळे जास्तीची काळजी घेण्याची गरज

पंढरपूर - सध्या जिल्ह्यात उष्णतेची लाट आली असून तापमान वाढत असून ते ४२ डिग्रीच्या पुढे जात आहे. वाढत्या उन्हामुळे उष्माघात होण्याचे प्रकार ही मोठ्या प्रमाणात वाढत असून सर्वसाम ान्य नागरिकांनी यापासून वाचण्यासाठी काळजी घेण्याची गरज आता निर्माण होत आहे.

उष्माघात म्हणजे शरीराचे तापमान १०० फॅ पेक्षा अधिक वाढणे. १०० फॅ. तापमानापर्यंत मानवी शरीर उत्तम राहू शकते. मात्र बाह्य तापमान अधिक झाले की ते संपूर्ण शरीरयंत्रणाच बिघडवून टाकते. साधारणपणे ३० अंश सेल्सिअसपर्यंतचे तापमान आपण सहज झेलू शकतो.

जेव्हा डोळ्यांचे स्नायू दुखतात, डोळे जड होतात, डोळ्याची जळजळ वाढते, आंधारी येते, डोके जड होते, कानाचे धडे बसतात, पापण्या अंकुचित होतात, अवटाळू बधीर होते, भुवया ताठरतात किंवा स्पंदतात, छातीत धडधडते तेव्हा उष्माघात झाला असे आपण समजू शकतो.

उष्माघात टाळण्यासाठी उन्हाळ्यात रोज किमान ४.५ लीटर पाणी प्यावे, घरातील पिण्याच्या पाण्यात १:२:३ या प्रमाणात खडीसाखर (गूळही चालेल),



धने आणि बडीशेप टाकूनच पाणी प्यावे, बाहेर जाताना १ लीटर पाण्यात दहा ग्रम वाळा आणि अर्धे लिंबू पिळून ते पाणी बरोबर घ्यावे व दोन तासात एक लीटर एवढे पाणी प्यावे. सोबत कायम कांदा ठेवावा. उष्म्याचा त्रास जाणवतो आहे असे वाटल्यास या कांद्यांचा काही भाग चावून (अत्यल्प) खावा व उरलेला ठेचून टाळूवर त्याचा लेप द्यावा, कलिंगडाचा एक ग्लास रस शरिराचे वाढलेले तापमान दहा डिग्रीने खाली आणतो.

उष्माघात होऊ नये म्हणून बर्फ खाऊ, उष्ण पदार्थ खाऊ नयेत, आत मांसाहार करू नये , मद्य घेवू नये, धुम्रपान करु नये, अति जेवण करु नये व उन्हात थांबून अचानक पाणी पिऊ नये.

## वादळी वाऱ्यामुळे शाळेचे छत उडाले

पंढरपूर - पंढरपूर तालुक्यातील नेपतगावं येथील माध्यमिक विद्यालय या प्रशालेचे रविवारी सायंकाळी झालेल्या वादळी वाऱ्यामुळे पत्र्याचे छत उडाल्याने सुमारे सात ते आठ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

मात्र रविवार असल्याने शाळेला सुट्टी असल्याने जीवित हानी टळली असल्याचे प्रत्यक्षदर्शी शेतकऱ्यांनी सांगितले आहे.

अचानक आलेले वादळ एवढे मोठे होते की वादळी वाऱ्यामुळे शाळेच्या दहा खोल्या वरील पत्र्याचे छत उडून त्यावरील पत्रे आणि इतर शालेय साहित्य उडून परिसरात आस्था वेस्त पडले होते. याम ध्ये पावसामुळे शालेय साहित्य, संगणक, प्रोजेक्टर यासह इलेक्ट्रॉनिक साहित्याचे मोठे नुकसान झाले असून त्यामुळे सात ते आठ लाखांचे आर्थिक नुकसान झाले आहे. ही बाब लक्षात घेऊन प्रशासनाने तात्काळ नुकसानीचे पंचनामे करून मदत जाहीर करावी. याचबरोबर शाळा उभारण्यासाठी नागरिकांनी मदत करण्याचे आवाहन मुख्याध्यापक आणि परिसरातील नागरिकांनी सांगितले.

## काँग्रेस पंढरपूर तालुका अध्यक्षाचा राजीनामा



पंढरपूर - लोकसभेच्या उमेदवार प्रणिती शिंदे विश्वासात घेत नसल्याचा आरोप करीत लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसचे तालुकाध्यक्ष हनुमंत मोरे यांना आपल्या पदाचा राजीनाम दिला असून लवकर आपली राजकीय भूमिका घेणार असल्याची घोषणा पत्रकार परिषदेत केली.

याबाबत माहिती देण्यासाठी मोरे यांनी पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका मांडली. यावेळी त्यांच्या समवेत अनिल बोराडे, आप्पा थिटे, नितीन व्यवहारे, दिलीप कोरके आदी उपस्थित होते.

हनुमंत मोरे यांनी १५ मार्च रोजी पंढरपूर तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. काँग्रेस पक्षाचा शिष्टाचारच वरिष्ठ नेतेमंडळींकडून पाळला जात नसल्याचा आरोप त्यांनी या वेळी केला. वास्तविक काँग्रेस पक्षात पदाधिकाऱ्यांना मोठी किंमत आहे. काँग्रेसचा कोणताही मोठा नेता, मंत्री किंवा पदाधिकारी ज्या भागात दौरा करतो. त्यावेळी काँग्रेसच्या अध्यक्षाला माहिती दिली जाते पक्षाचा असा प्रोटोकॉल आहे. मात्र प्रणिती शिंदे या सदर शिष्टाचार पाळत नाहीत. याबाबत तक्रार करूनही कोणताच बदल होत नसल्याने या पक्षात आपला स्वाभिमान दुखावला असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. दरम्यान हा राजीनामा काँग्रेस पक्षाकडून अद्याप स्वीकारला गेला नाही. तरीही यापुढे आपण काँग्रेसमध्ये काम करणार नसल्याचे जाहीर केले.

## शरद पवार यांची मोडनिंबमध्ये सभा



सोलापूर - माढा लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या प्रचारासाठी माजी केंद्रीय कृषीमंत्री खासदार शरद पवार यांची २४ एप्रिल रोजी मोडनिंब येथे सभा आयोजित करण्यात आली आहे. माढा लोकसभा मतदारसंघात खासदार शरद पवार यांच्या मोडनिंब, करमाळा, सांगोला दहिवडी, फलटण आणि अकलूज येथे सभा होणार आहेत. यातील पहिली सभा मोडनिंब ता माढा येथे २४ एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता मार्केट यार्डात होणार असल्याचे महाविकास आघाडीच्यावतीने सांगण्यात आले. याबाबतची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.






## भाविकांना दर्शन रांगेत शुध्द पिण्याचे पाणी, लिंबू सरबत, खिचडीचे वाटप - कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके

पंढरपूर - चैत्री शुध्द एकादशी १९ एप्रिल रोजी संपन्न होत असून, या चैत्री यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणीम ातेच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. सध्या उन्हाळा सुरु असून, दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे. भाविकांना उन्हाचा त्रास जाणवू नये यासाठी पत्राशेड व दर्शनरांगेत आवश्यक उपाययोजना केल्या आहेत. तसेच दर्शन रांगेतील भाविकांना दशमी, व द्वादशी दिवशी तांदळाची खिचडी, एकादशी दिवशी साबुदाण्याची खिचडी त्याचबरोबर लिंबू सरबत अथवा मठ्ठा मोफत वाटप करण्यात येणार असल्याचे मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

याचा शुभारंभ गुरुवार दिनांक १८ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ९.३० वाजता करण्यात आला. यावेळी मंदिर समितीच्या सदस्या श्रीमती शकुंतला नडगिरे, ह भ प श्री ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक बालाजी पुदलवाड तसेच विभाग प्रमुख



ज्ञानेश्वर कुलकर्णी, बलभीम पावले व भीम ाशंकर सारवाडकर उपस्थित होते.

त्याचबरोबर यात्रा कालावधीत दर्शन रांगेतील भाविकांना थंड व शुद्ध पिण्याचे पाण्याचे वाटप करण्यात येत आहे. तसेच आरोग्य सुविधा, लाईव्ह दर्शन व्यवस्था मंदिर आदींची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. मंदीर समितीमार्फत यात्रा कालावधीत दर्शन रांगेतील भाविकांना दिल्या जाणाऱ्या सोई सुविधा आवश्यकतेनुसार वाढवण्यात येत असल्याचे मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

# संपादकीय

## आंबा विक्रीत ग्राहकांची फसवणूक

मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्ग असेल किंवा पुणे–बंगलूरु महामार्ग या महामार्गांवर जागो–जागी आंबे विक्रीचे स्टॉल आहेत. कधी–कधी या महामार्गांवरून फिरताना कोकणच्या लोकांनाही आश्चर्य वाटावे अशी स्थिती होते. जेव्हा कोकणातील हापूस आंबा देवगड, विजयदुर्ग, वेंगुर्ले, मालवण या आंबा होणाऱ्या भागामध्ये विक्रीला नसतो, तेव्हा महामार्गावर एवढा आंबा विक्रीला कसा काय आणि कुठून येतो. मग लक्षात येते की, आंबा कर्नाटकचा, बॉक्स देवगड हापूसचे, आतमध्ये पॅकिंगसाठी वापरला जाणारा कागद कोकणातील वृत्तपत्रांच्या रद्दीचा. फार नियोजनबद्ध पद्धतीने ग्राहकांची फसवणूक केली जात आहे. खुल्या बाजारपेठांमध्ये कोणीही, कुठेही विकावे त्यामुळे कर्नाटकचा हापूस, देवगड हापूस म्हणून विकला जातो. त्यावर आंबा बागायतदार काहीही करण्याच्या मानसिकतेत नाहीत; परंतु यामुळे काय होतयं की देवगड हापूसऐवजी कर्नाटकचा आंबा ग्राहकांकडे जातोयं. यामुळे कर्नाटक हापूसची जी काही टेस्ट असेल ती ग्राहकांपर्यंत जाते. कोकणातील आंबा बागायतदार आजही रुमालाच्या खालून होणाऱ्या मार्केटमधील व्यवहारावरच अवलंबून आहेत. कोरोनानंतर एक गोष्ट घडली की, आंबा विक्रीचे मार्केट बदलले. कोरोना काळात नागपूर, बारामती, कोल्हापूर, पुणे, नागपूरकडचे व्यावसायिक थेट आंबा बागायतदारांच्या बागायतींमध्ये येऊन आंबा खरेदी करू लागले. यामुळे बागायतदारांना चांगला दर मिळाला; मात्र ही विक्री व्यवस्था पुढे तशीच चालू राहण्यासाठी प्रयत्न व्हायला पाहिजे होते. यासाठी बागायतदारांनीही आंबा विक्री करताना गुणवत्तेची तडजोड करता कामा नये; परंतु तसे काही होत नाही. बऱ्याच वेळा पेटी भरताना वरचा थर चांगल्या आंब्यांचा आणि तळाला कोवळा आंबा भरला जातो. यामुळे ही होणारी फसवणूक शेवटी आंबा व्यवसायावर अविश्वासच निर्माण करणारी आहे. क्षणिक पैशांच्या लोभापायी ही जी काही फसवणूक केली जाते, त्यामुळे आंबा विक्री व्यवस्थेत कोकणातील आंबा बागायतदार बदनाम होतोय याची जाणीव आणि भान सतत राखले गेले पाहिजे. कल्टारने नेमके काय बिघडवले आणि कल्टारने आंबा बागायतदार शेतकऱ्यांना किती पैसे मिळवून दिले हे बागायतदार शेतकरीच सांगू शकतील. कल्टारला विरोध करणारेही बागायतदार शेतकरी होते. शेती बागायती या अलीकडच्या काही वर्षांत निसर्गावर अवलंबून राहिली आहे. या निसर्गाच्या लहरीपणामुळे फटका बागायतदार शेतकरी आणि मच्छीमारांनाही बसत आहे. यामुळे एकिकडे निसर्गाची बेभरवशी म्हणता येईल अशी स्थिती असताना बागायतदार शेतकऱ्यांनी फार काळजीपूर्वक आंब्याचे मार्केट जपले पाहिजे. परंतु दुर्दैवाने असे घडत नाही. ते जपण्यासाठी कोणतेही प्रयत्न संघटीतरीत्या होत नाहीत. त्यावर चर्चाही करण्याची कोणाचीही मानसिकता नाही. एकदा कोकणच्या हापूसची बदनामी झाली तर आंबा विक्री मार्केटमध्ये कोकणातील आंबा घेण्यासाठी ग्राहक आंबा घेणार नाही. आज गुजरात, कर्नाटकमधून बाराही महिने आंबा येतोय. यामध्ये आपण कुठेच बसत नाही. त्यामुळे आपण आपल्या कोकणच्या हापूस आंब्याची मिजास न दाखवता ग्राहकाला जपला पाहिजे. क्षणिक फायद्यासाठी आंबा विक्री मार्केट खराब केले जाता कामा नये. राजापूर भागातही आंबा विक्री थेट कंपन्यांना केली जात होती. कंपनीने खरेदीची तयारी दाखवली. दरही चांगला दिला गेला; परंतु बागायतदार शेतकऱ्यांनी कोवळे आंबे पाठवले. शेवटी कंपनीने खरेदी व्यवस्था बंद केली. चार पैसे अधिकचे मिळणारी ही व्यवस्थाच कोलमडून टाकण्याचा करंटेपणा काही आंबा बागायतदार शेतकऱ्यांनी केला. कोकणच्या हापूस आंब्याचे असलेले एक स्थान जाता कामा नये. ते स्थान अव्वलस्थानीच राहावं असे वाटत असेल तर कोकणातील सर्वच आंबा बागायतदार शेतकऱ्यांनी आंब्याची गुणवत्ता कायम राखली पाहिजे. अन्यथा कर्नाटकचा आंबा फळांचा राजा म्हणून मार्केटमध्ये अव्वलस्थानी दिसला, तर नवल वाटायला नको.



## दिपक नाईकनवरे यांना शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्रदान

पंढरपूर (प्रतिनिधी) अ.नगर येथे युवाक्रांती महाराष्ट्र राज्य संस्थेच्या वतिने विविध क्षेत्रातील कार्य करणाऱ्या कर्तृत्वान मान्यवरांचा सन्मान सोहळा शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार संपन्न विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान. पंढरपूरातील मा. दिपक नाईकनवरे यांना आणखी एक सामाजिक क्षेत्रातील प्रतिष्ठेचा हा पुरस्कार मिळाला आहे. या कार्यक्रमामध्ये आमदार संग्रामभैय्या जगताप, मा.श्री. दादा महाराज वसेकर (सावतामाळी यांचे १७ वे वंशज), डॉ. सागर बोरडे (नगरसेवक), मा. धनंजयभैय्या जाधव (नगरसेवक) व या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण, मा. राज चामरे, प्रसिद्ध मॉडेल, क्टर मिस्टर इंडिया २०२०, व मा. सुमैय्या पठाण,(प्रसिद्ध सेलेब्रिटी, व फॅशन डिझायनर मराठी हिंदी बिग बॉस शो) व मुख्य संपादक तुषार बोरुडे उपस्थित होते. यावेळी बोलताना दिपक नाईकनवरे म्हणाले की, असे पुरस्कार मला प्रेरणा देतात, पुढे आणखी जोमने कार्य करण्याची ऊर्जा देतात अशा पुरस्काराने समाजातील माझी जबाबदारी अजून जास्त वाढली आहे. शिव–शाहू–फुले–आंबेडकर व सर्व महापुरुषांच्या विचारांचा वारसा पुढे घेऊन समाजातील युवा पिढींना चांगली दिशा देण्याचे कार्य करीत आहे. हा पुरस्कार म्हणजे मी आतापर्यंत केलेल्या निःस्वार्थी आणि प्रामाणिक कार्याची पावतीच आहे. मला खूप आधीपासूनच सामाजिक कार्याची आवड असल्याने लोकांच्या अडचणी सोडविणे तसेच लोकांना लहान–मोठ्या प्रशासकीय कामांमध्ये मदत करणे, तसेच माझ्या परीने होईल तितकी मदत करणे या सगळ्याची दखल घेऊन मला हा पुरस्कार मिळाला आहे. मी व माझे बंधू विक्रम माझ्या वडीलांचे पाऊलावर पाऊल ठेऊन कार्य करीत आहे. व त्यांनी जी स्वप्ने पाहीली ती पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहोत. आता पर्यंत कला, क्रीडा, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रामध्ये मला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्यामध्ये हा एक मानाचा पुरस्कार मिळाल्याने मला आणखी जोमाने कार्य करण्याची जबाबदारी वाढली आहे. जी मी नक्की पार पाडेन व पुढे देखिल अशीच उल्लेखनीय कार्य करुन माझ्या वडीलांचे स्व. राजाराम नाईकनवरे यांचे व पंढरपूरचे नांव लौकिक करण्याचा प्रयत्न करेन. हा पुरस्कार मिळाल्यामुळे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिक/साप्ताहिक/न्यूज पोर्टल/न्यूज चॅनेल वर प्रसिद्ध व्हावी ही विनंती.

अधिक माहितीसाठी – दिपक नाईकनवरे (मोबा. ९८२२७७८१४७)

## करकंब येथील ग्रामदैवत श्री. कनकंबादेवी यात्रा महोत्सवास आजपासून सुरुवात....!

करकंब – करकंब ता. पंढरपूर येथील सालाबादप्रमाणे चैत्र महिन्यात हनुमान जयंती च्या दिवशी हनुमान दिवशी सुरुवात होत असलेल्या ग्रामदैवत श्री कनकंबा देवीच्या यात्रेस मंगळवार पासून विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी सुरुवात होत आहे.

मंगळवार दि.– २३ रोजी पहाटे देवीला अभिषेक घालून पूजाअर्चा व सायंकाळी ६ वा करकंब नगरीतून देवीचा छबीना व पालखीची वाजत गाजत मिरवणुक कनकंबा मंदिर – बस स्टँड – शुक्रवार पेठ – धाकटी वेस येथून सोमवार पेठेत श्री अमरसिंह व श्री उज्वलसिंह देशमुख यांच्या वाड्यामध्ये देवीच्या पालखीची विधिवत पूजन करण्यात येणार आहे. तसेच बुधवार दि –२४ रोजी भेदी गाण्यांचा कार्यक्रम व दुपारी ४ वाजता भव्य कुस्त्यांचा फड होणार आहे.गुरुवार दि २५ रोजी सिनेस्टार मृणाल कुलकर्णी यांचा लावण्याखणी कार्यक्रम सायंकाळी ७ वाजता होणार आहे. शुक्रवार २६ रोजी राष्ट्रपती सुवर्ण पदक विजेती मालती इनाम दार नारायणगावकर यांच्या लोकनाट्य तमाशाचे मनोरंजनांच्या कार्यक्रमाचे आयोजन ट्रस्ट कमिटी व पंच कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे अशी माहिती श्री अशोकसिंह देशमुख यांनी दिली आहे. यात्रा यशस्वी करण्यासाठी पंच कमिटीचे अमोल शेळके, बाजीराव खाडे,अजितसिंह देशमुख, पांडुरंग शेटे, शिवाजी सलगर,राजेंद्र खारे, विलास धनवे,भीमराव मदने आदी परिश्रम घेत आहेत.

तनावामागचे प्रोग्रामिंग

सरश्री



तुम्ही लहानपणी नक्कीच कधीतरी कागदाचं विमान बनवून उडवलं असेल, तेव्हा आजही तुम्हाला तेच करायचं आहे. तणाव आला, की प्रथम या तणावामागे कोणतं प्रोग्रामिंग रन होत आहे हे शोधून काढायचं आहे. आधी या तणावामागे कोणतं प्रोग्रामिंग आहे ते शोधून काढा. आतून जे काही नकारात्मक, तक्रारीचे, रागाचे, अपराधीपणाचे विचार चालू असतील, ते कागदावर लिहा. काहींच्या मनात आत्महत्येसारखे विचारही येत असतात. असे विचारदेखील कागदावर लिहून काढा. ते प्रोग्रामिंग आणि त्याच्याशी संबंधित अन्य धारणासुद्धा कागदावर लिहा.

उदाहरणार्थ, पैशांच्या कमतरतेबद्दल, तुम्हाला असे वाटते, 'मी खूप मेहनत करतो, तरीही मला पैसा मिळत नाही किंवा आला तरी टिकत नाही... माझ्याकडे पैसा कमी आहे...' इत्यादी. पण एकदा नीट विचार करा आणि बघा, पैसा कमावण्याची इच्छा असूनही, तुमच्या मनात अशी धारणा तर नाही ना, की खूप पैसा आला तर तो सांभाळण्यात मी असमर्थ ठरेन,

म्हणजेच नकळत तुम्ही पैशाच्या आगमनाला विरोध करत असता, जेणेकरून तो तुमच्या जीवनात येऊ नये. मात्र तुम्हाला हे माहीत नाही, की तुमच्या अंतर्मनात पैशांच्या बाबतीत या धारणा पक्क्या झालेल्या आहेत म्हणूनच तुमच्याकडे पैसा टिकत नाही.

अशा सर्व प्रोग्राम झालेल्या गोष्टी, चित्र किंवा दृश्याच्या रूपात आत मनात सुरू असतात. परंतु आता ही प्रोग्राम केलेली चित्रं आणि दृश्य यातून मनावरची पकड सैल करावी लागेल. म्हणून या सर्व गोष्टी एका कागदावर लिहा आणि एखाद्या उंच ठिकाणावरून उडवून द्या. म्हणजे त्या परत तुमच्याकडे येऊ शकणार नाहीत.

तुम्हाला त्रास देणाऱ्या नकारात्मक सवयी, धारणा ब्रह्मांडात विलीन झाल्या आहेत आणि तेथून तुम्हाला विनर्जीच्या रूपात गिफ्ट येत आहेत. असं या लांब जाणाऱ्या कागदी विमानाद्वारे

तेजज्ञान फाउंडेशन
9921008060
helpdesk@tejgyan.org

## चळे, आंबे, तारापूर, मगरवाडी येथे दर्लिंग यात्रेस सुरुवात

पंढरपूर – तालुक्यातील चळे, आंबे, तारापूर, मगरवाडी येथे २२ एप्रिल रोजी रात्रीपासून श्री दर्लिंग यात्रेचा महोत्सवास प्रारंभ झाला आहे. या चारही गावांमधून यात्रेचा प्रारंभ कालावधी समान असतो. आणि ज्या त्या गावच्या पद्धतीनुसार आणि गावातील पंचमंडळीच्या विचारानुसार यात्रा समाप्तीचा कालावधी ठरतो.

ही यात्रा अनेक वर्षापासून सुरू असून ती एक महाराष्ट्रातील वैशिष्ट्यपूर्ण यात्रा समजली जाते. या यात्रेला दोन राज्याच्या (महाराष्ट्र व कर्नाटक) ऋणानुबंधात गुंतले गेले आहे. या यात्रेचा उत्सव म्हणजे श्री दर्लिंग व मिताबाई यांचा विवाह सोहळा संपन्न केला जातो. या यात्रेला ऐतिहासिक किनारही आहे. या यात्रेची पूर्व नियोजनाची तयारी गुढीपाडव्यापासून होते. श्री दर्लिंग व मिताबाई यांच्या विवाह सोहळ्याचे साहित्य आणण्यासाठी विजयपूर येथे जाण्याची परंपरा आहे. ते साहित्य आणण्यासाठी आंबे येथील निवडक व इच्छुक ग्रामस्थ १४ एप्रिल तर चळे येथील नागरिक १५ एप्रिल रोजी पायी चालत मार्गस्थ झाले होते. यात्रेत हिंदू मुस्लीम व इतर सर्व समाज बांधव सहभागी होतात.

हे पत्र मुद्रक सोमनाथ नवनाथ शिंदे यांनी प्रकाशक सचिन हरी आदापुरे व मालक सचिन हरी आदापुरे यांचे करीता दर्लिंग ग्राफिक्स, जुना बस स्टँड शेजारी, दर्शन उद्योग भवन, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर येथे छापून घर नं.१२२५, नाथ चौक, पंढरपूर, जि.सोलापूर येथून प्रकाशित केले. संपादक : सचिन हरी आदापुरे, घर नं.१२२५, नाथ चौक, पंढरपूर, जि.सोलापूर मो.नं.९८५००२७६४३ (या अंकात प्रसिध्द झालेल्या मजकुरांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्ष–पंढरपूर)

printed by SOMNATH NAVNATH SHINDE and published by SACHIN HARI ADAPURE and on behalf of SACHIN HARI ADAPURE printed at DARLING GRAPHICS, near old bus stand, darshan udyog bhavan , pandharpur, Dist - Solapur and published by Nath chouk pandharpur Editor : Sachin Hari Adapure, House No 1225, Nath chouk, Pandharpur Mob.9850027643

# करकंब पोलीसांची दोन सराईत गुन्हेगार यांना केले तडीपार

पंढरपूर – पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे , अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपुर विभाग अर्जुन भोसले यांचे मार्गदर्शनखाली लोकसभा निवडणुक – २०२४ च्या अनुषंगाने सराईत गुन्हेगार यांचेवर प्रतिबंधात्मक कारवाई करणेबाबत आदेश दिलेले होते.

करकंब पोलीस ठाणे हद्दीतील रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार यांचेवर दोन पेक्षा जास्त दखलपात्र गुन्हे असुन त्यामध्ये जामीनावर असतानाही ते पुन्हा पुन्हा मारामारी, खुनाचा प्रयत्न, चोरी व जबरी चोरी या सारखे गुन्हे करीत आहेत. तसेच त्यांचेवर प्रतिबंधात्मक कारवाई करुनही त्यांचेमध्ये फरक पडत नसल्याने २७ गावातुन टॉप १० गुडांची यादी बनवुन त्यांना दोन वर्षाकरीता हद्दपार करणेकरीता मा. उपविभागीय दंडाधिकारी पंढरपुर यांचेकडे मा. पोलीस अधिक्षक व मा. उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपुर यांचे मार्फतिने प्रस्ताव पाठविण्यात आलेले होते.

सदरच्या आरोपींचे वर्तणुकीमुळे सार्वजनिक शांतता अबाधित ठेवणे पोलीसांना अवघड झाले आहे. रेकॉर्डवरील गुन्हेगार सध्या न्यायालयाचे कस्टडीचे बाहेर जामीनावर असून आपली गुन्हेगारी कृत्ये सतत ठेवून सर्वसामान्य लोकांचे दैनंदीन जिवन सुरळीत पणे पार पाडणेस बाधा आणत आहेत. त्यामुळे त्याचे हातून आणखीन शरिराविषयी, मालाविषयी व महिला अत्याचाराविषयी गंभीर स्वरूपाचे गुन्हे घडून सामाजिक शांततेचा व सुव्यवस्थेचा भंग होण्याची दाट शक्यता आहे. लोकसभा निवडणुक – २०२४ व विधानसभा निवडणुक–२०२४ मध्ये निर्भय व भयमुक्त पार पाडणेकरीता व सदर कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे करीता प्रतिबंध करणे आवश्यक होते.

सदरच्या करकंब पोलीसांनी पाठविलेल्या प्रस्तावामधील पेहे गावातील रेकॉर्डवरील गुन्हेगार बिभीषण उर्फ बिभ्या बाळु बंडगर व मारुती प्रल्हाद मारकड रा. बादलकोट यांना सचिन इथापे, उपविभागीय दंडाधिकारी पंढरपुर यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये ०२ वर्षाकरीता सोलापुर जिल्हयातुन हद्दपार केलेले आहेत. आणखीन ०८ ते १० सराईत गुन्हेगार करकंब पोलीसांचे रडावर असुन त्यांचेवरही कायदेशीर कारवाई सुरु आहेत.

# मोदी पुन्हा सत्तेवर येताच भीमा नदीवर मोठे बंधारे बांधणार : माजी आ. प्रशांत परिचारक

पंढरपूर – पंढरपूरसह सोलापूर जिल्ह्यातील पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी मोदी सरकार तिसऱ्यांदा सत्तेवर येताच भीमा नदीवर मोठे बंधारे बांधण्यात येणार आहेत, अशी माहिती माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी दिली.

सोलापूर लोकसभा निवडणुकीबाबत पांडुरंग परिवाराची १७ गावांची विचारविनिमय बैठक पुळूज येथे पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती राजू गावडे यांच्या निवासस्थानी झाली. यावेळी व्यासपीठावर मोहोळचे आमदार यशवंत माने, माजी आमदार राजन पाटील, भाजपा व महायुतीचे उमेदवार राम सातपुते, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष प्रकाश चवरे, माजी सभापती दिलीप घाडगे, दिनकर मोरे, दिलीप चव्हाण, सभापती हरीश गायकवाड, मंडल अध्यक्ष भास्कर कसगावडे, प्रशांत देशमुख, पंडित भोसले, संतोष घोडके, सुनील भोसले, मोहन खरात, तानाजी पवार, पंडित रोबडे, महादेव बागल, म हादेव लवटे, नागनाथ मोहिते, बाबासाहेब पाटील उपस्थित होते.

यावेळी त परिचारक म्हणाले, भाजप सरकारने स्वच्छ पिण्याचे पाणी मि ळण्यासाठी तीन लाख कोटी रुपयांची




योजना मंजूर केली. त्याची कामे आज गावोगावी सुरू आहेत. या माध्यमातून ६५ कोटी कुटुंबाला शुद्ध पाणी मिळणार आहे. ८० कोटी लोकांना पुढील पाच वर्षे रेशन भाजप सरकार मोफत देणार आहे. ७५ हजार कोटी रुपये खर्च करून शेतकरी पेन्शन दिली जाते. यामध्ये कुठल्याही प्रकारचा भ्रष्टाचार न होता हे पैसै थेट शेतकऱ्याच्या खात्यावर येतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकारम ध्ये भ्रष्टाचाराला आळा बसल्याचे माजी आमदार प्रशांत परिचारक याप्रसंगी म्हणाले. माजी आमदार राजन पाटील म्हणाले, कृष्णा आणि भीमा नदीचे पाणी दुष्काळी भागासाठी देण्याकरिता पंतप्रधान नरेंद्र मोदी आग्रही आहेत. मोदी हे तिसऱ्यांदा पंतप्रधान म्हणून निवडून येणार आहेत. अशावेळी सोलापूरकरांनीही नरेंद्र मोदी यांना समर्थन द्यावे.

भाजपा आणि महायुतीचे उमेदवार आम दार राम सातपुते म्हणाले, मी ऊसतोड कामगाराचा मुलगा आहे. गोरगरीब जनतेच्या प्रश्नांची मला जाणीव आहे. त्यामुळे आगामी काळातही सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांची सोडवून करण्याला प्राधान्य असेल. याकरिता सोलापूरकरांनी भाजप आणि महायुतीच्या पाठीशी रहावे, असे आवाहन त्यांनी केले.

# करकंब येथे महावीर जयंती उत्साहात साजरी

करकंब – करकंब येथे वर्तमान शासन नायक १००८ श्री. महावीर भगवान जन्म कल्याणक यांची जयंती सकल जैन समाज च्या वतीने पारंपरिक संगीत सहवाद्याने व विशेषता सकल जैन समाजातील महिलांच्या ढोल ताशांच्या गजरात उत्साहात साजरी झाली.

करकंब, ता. पंढरपुर–१००८ श्री आदिनाथ भगवान जैन मंदिर आणि १००८ श्री नेमिनाथ भगवान जैन मंदिर, करकंब सकल जैन समाज यांच्या सहभागाने करकंब नगरी मध्ये सकाळी मिरवणुक ८.३० वाजता मंदिरापासून सुरू झाली.

ही मिरवणूक सोमवार पेठ,आतार चौक, पुरवत गल्ली, शुक्रवार पेठ, धाकटी वेस, विठ्ठल मंदिर, कसबा पेठ, मेन रोड मार्गे परत जैन मंदिरापर्यंत काढण्यात आली.. या मिरवणुकीच्या पुढे महिलांच्या ढोल ताशांचे प्रमुख आकर्षण ठरले.तसेच पारंपरिक संगीत सहवाद्यासह श्री भगवतांची पालखी, त्या पाठीमागे महावीर भगवान यांची प्रतिमा भव्य मिरवणूक सोहळा करकंब नगरीतून काढण्यात आला. यावेळी करकंब येथील संपूर्ण सकल जैन समाज व महिला युवावर्ग या महावीर जयंतीच्या मिरवणुकीमध्ये सहभागी झालेला होता.



# रणजीतसिंह निंबाळकरांसाठी डॉ. रोंगे सरांचा गाठीभेटीवर भर

**पंढरपूर** – माढा लोकसभेचे भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रचारार्थ पंढरपूरचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे सर यांनी करकंब सह ४२ गावांमध्ये स्वतः प्रत्यक्ष जाऊन गाठीभेटी घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गेल्या दहा वर्षातल्या विकास कामाची माहिती देत व माढा लोकसभेचे उमेदवार रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांच्या विजयासाठी जोरदारपणे भर दिला असून या प्राचार्य डॉ. रोंगे सरांच्या गाठीभेटीला प्रचंड प्रतिसाद मि ळत आहे.

यावेळी प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे सर, भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष सुरेश उर्फभाऊसाहेब अंबुरे सर, भाजपाचे कामगार आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष मनोज पवार, रयत क्रांती रयत क्रांती संघटनेचे युवा जिल्हा उपाध्यक्ष नंदकुमार व्यवहारे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष महेंद्र पवार, भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष रोहिदास चौगुले, गोरक्षक आकाश धोत्रे, बापू धांडे, संजय नलवडे,आदीसह भाजपा, बजरंग दल विश्व हिंदू परिषद चे पदाधिकारी कार्यकर्ते यावेळी बहुसंख्येने उपस्थित होते.

# माढा मतदारसंघात गुन्हेगार आणि कामचोर उमेदवार–लक्ष्मण हाके

पंढरपूर – माढा लोकसभा मतदार संघातून ओबीसी बहुजन पार्टीचे उमेदवार लक्ष्मण हाके यांनी विरोधी उमेदवारांवर टीकेची झोड उठवली. महाविकास आघाडीचा उमेदवार गुन्हेगारी पार्श्वभूमीचा, तर महायुतीचा उमेदवार कामचोर असल्याचे त्यांनी सांगितले. आपली उमेदवारी ही ओबीसी चळवळीस पुढे घेऊन जाणारी असेल,असे सांगून पुढील दिवस ओबीसी बांधवांचेच असतील असा आत्मविश्वास त्यांनी पंढरपूर येथील पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

त्यांच्या समवेत ओबीसी नेते बाबा चव्हाण यांच्यासह इतर नेतेमंडळी उपस्थित होती.

महाविकास आघाडीकडून आपणास उमेदवारी घोषित झाली होती. शरद पवार यांनी तसा शब्दही दिला होता. परंतु त्यांनी जाहीर केलेल्या दहा उमेदवारांपैकी सात उमेदवार हे मराठा समाजाचे आहेत. यावरून त्यांची ओबीसी समाजाविषयीची भावना काय आहे हे दिसून येते. महाराष्ट्रात ६० टक्के असणारा बहुजन समाज आजही राजकीय बाबतीत उपेक्षित आहे. या वर्गाला जाणून बुजून मागे ठेवले जाते. आजवर महायुतीसह महाविकास आघाडीने या समाजास वापरून घेतले आहे. ओबीसी बहुजन समाजाला न्याय मिळवून देण्यासाठीच स्वतःची उमेदवारी दाखल केली आहे. आता कोणत्याही परिस्थितीत माघार नाही. महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील यांच्यावर तब्बल ३१ गुन्हे दाखल आहेत. याची माहिती त्यांनीच निवडणूक आयोगाकडे दिली आहे. अजून त्यांच्यावर अदखलपात्र गुन्हे किती आहेत, हे त्यांनाच माहिती असेल ,असे उदगार यावेळी त्यांनी काढले.

महायुतीचे उमेदवार खा. नाईक निंबाळकर यांच्याही कामाचा त्यांनी लेखाजोखा मांडला. न केलेली कामे सांगण्यात निंबाळकर पटाईत आहेत. लाखो कोटी रुपयांची विकासकामे करणाऱ्या खा. निंबाळकर यांची विकासकामे मात्र नजरेत येत नाहीत,असे सांगून त्यांनी त्यांच्यावरही टीकेची झोड उठवली. देशात असणारा साठ टक्के ओबीसी समाज आजही राजकीय दृष्ट्या मागासलेला आहे. आजवर या समाज बांधवांचा राजकीय वापर करून घेण्यात आला आहे. आता या समाजास त्यांच्या हक्काची जाणीव झाली आहे. या समाजाच्या उन्नतीसाठी ही चळवळ पुढे घेऊन जाण्यासाठी आपण उमेदवारी दाखल केली आहे. माढा मतदारसंघात तब्बल १३ लाख ओबीसी बांधव आहेत. या बांधवांच्या हक्काची जाणीव माझ्या उमेदवारीमुळे होईल, असा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला.

# अंगावर विज पडून ८ वर्षीय मुलीचा दुर्दैवी मृत्यु

सोलापूर – राज्यात गेल्या आठवड्यापासून वातावरण पूर्णपणे बदलून गेलं आहे. कधी सोसाट्याचा वारा तर अवकाळी पाऊस तर कधी गारांनी झोडपलं आहे. या अशा वातावरणामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालाचं मोठं नुकसान झालं आहे. एकीकडे कडक उन्हामुळे अंगाची लाहीलाही होत असताना दुसरीकडे वळवाचा नागरिकांना झोडपून काढत आहे. सोलापूर जिल्ह्यातही अवकाळी पावसाने शेतकऱ्यांची दाणादाण उडवून दिली. शनिवारी एक घटना सर्वांना चटका लावून गेली. सोलापुरात अंगावर विज पडून आठ वर्षीय चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुस्ती गावात मन हेलावून टाकणारी घटना घडली. मुस्ती गावातील शेतात वीज पडून लावण्या हनुमंता माशाळे या आठ वर्षीय चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाला. सकाळपासून कडक ऊन असताना अचानकपणे हवामानात बदल होऊन विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाला सुरुवात झाली होती. लावण्या माशाळे हिला उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तिला तपासून मृत घोषित केले. दुर्दैवी घटनेनंतर मुलीच्या नातेवाईकांचा सरकारी रुग्णालयात मोठा आक्रोश पाहायला मि ळाला. अनपेक्षित घटनेमुळे हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# प्रणिती शिंदे यांच्या प्रचारार्थ काँग्रेस नेते राहुल गांधींची २४ एप्रिलला सोलापुरात जाहीर सभा





सोलापूर – लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून ठिकठिकाणी इंडिया आघाडीच्या स्टार प्रचारकांच्या तोफा धडाडू लागल्या आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी हे देखील जाहीर सभा घेऊन आघाडीच्या उमेदवारांना बहुमताने विजयी करण्याचे आवाहन करत आहेत. दरम्यान, सोलापूर येथे देखील काँग्रेसच्या अधिकृत उमेदवार प्रणिती शिंदे यांच्या प्रचारार्थ २४ एप्रिल रोजी राहुल गांधी यांची जाहीर सभा पार पडणार आहे.

सोलापूर लोकसभा मतदारसंघासाठी येत्या ७ मे रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांच्या प्रचारार्थ काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. ही सभा बुधवार दिनांक २४ एप्रिल रोजी सोलापूर शहरातील मरीआई चौकातील एक्झिब्युशन ग्राउंड येथे दुपारी ३ वाजता पार पडणार असल्याची माहिती निवडणूक प्रमुख प्रकाश यलगुलवार, सोलापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे, आणि काँग्रेस जिल्हा कार्याध्यक्ष नंदकुमार पवार यांनी दिली. सोलापूर लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या प्रणिती शिंदे आणि भाजपचे राम सातपुते यांची लढत चुरशीची होत आहे. सध्या प्रणिती शिंदे या गावभेट दौरे करून मतदारांच्या गाठीभेटी घेत आहेत. प्रणिती शिंदे यांच्या प्रचाराचा वेग वाढला असून मतदारांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद मि ळत आहे. तरी काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या सर्व नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने राहुल गांधी यांच्या सभेला उपस्थित रहावे, असे आवाहन यावेळी काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आले.

# भाजपाने फसवलं आता काँग्रेसच विकासाची गॅरेंटी -माजी मंत्री सतेज पाटील यांची टीका



पंढरपूर – मागील दहा वर्षात भाजपाची गॅरेंटी सर्वांनी पाहिली असून महागाईने जनता त्रस्त आहे. मात्र काँग्रेस पुढील दहा वर्षाच्या विकासाची गॅरेंटी देत असून कर्नाटक, तेलंगणा राज्यातील जनता याचा अनुभव घेत आहे. असा दावा माजी मंत्री सतेज उर्फ बंटी पाटील यांनी पंढरपूर तालुक्यातील कासेगाव येथील सभेत केला.

कासेगाव येथे काँग्रेसच्या सोलापूर लोकसभेच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांच्या प्रचारार्थ सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार अमित देशमुख, बीआरएसचे नेते भगीरथ भालके, काँग्रेसचे नेते प्रकाश पाटील आदींसह विविध पदाधिकारी, नेते उपस्थित होते.

यावेळी बोलताना बंटी पाटील यांनी भाजपा सरकारवर जोरदार टीका केली. भाजपा चारशे पारचा नारा देत असला तरी त्यांचे दोनशेच्या वर खासदार निवडून येणार नाहीत असा दावा केला. भाजपाला आपल्या दहा वर्षाच्या विकासकामांवर विश्वास होता तर इतर पक्ष फोडून का निवडणूक का लढवली जात आहे. असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. राज्यात महाविकास आघाडीच्या ४८ पैकी ३९ जागा निवडून येणार असून यामध्ये काँग्रेसच्या १२ हून अधिक जागा असतील असा दावा पाटील यांनी केला. मागील दहा वर्षे आपण फसलो असून आता फसू नका. कोल्हापूर आमच ठरलय त्या प्रमाणे सोलापूरला पण ठरवा आणि प्रणिती शिंदे यांना लोकसभेत पाठवा असे आवाहन बंटी पाटील यांनी केले.

तर आमदार अमित देशमुख यांनी, स्व.विलासराव देशमुख व माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचे एक वेगळच नात होत. त्यांना राजकारणात दो हंसो का जोडा म्हंटल जात असे. आणि या नात्यामुळेच मी प्रणिती शिंदे यांच्या प्रचारासाठी आलो असल्याचे उद्गार काढले. राज्यात सध्या फोडाफोडीचे मोठ राजकारण सुरू आहे. परंतु स्व.देशमुख हे आठ वर्षे मुख्यमंत्री होते. शिंदे देखील अनेक वर्ष मुख्यमंत्री होते परंतु यांनी कधी फोडाफोडीचे राजकारण केले नाही. राज्याची संस्कृती जपण्याचे काम काँग्रेसने केले असल्याचे प्रतिपादन केले. परंतु सध्या मतं मागायचे घड्याळ चिन्हावर व पाठींबा द्यायचा अजित पवार यांना, मत मागायच धनुष्यबाण चिन्हावर व पाठींबा द्यायचा एकनाथ शिंदे यांना अस राजकारण सुरू असल्याची टीका अमित देशमुख यांनी केली.

प्रणिती शिंदे यांनी, भाजपा विकासवर न बोलता जात, धर्म यावर बोलतात. या पक्षाने देशात किड लावली असून ही किड उपटून टाकण्यासाठी एक व्हा असे आवाहन केले. तर भगीरथ भालके यांनी, स्व.भारत भालके यांच्यामुळे खऱ्या अर्थाने मंगळवेढ्याच्या दुष्काळी भागाला पाणी मिळाले असताना याचे श्रेय निर्लज्जपणे इतर घेत असल्याची टीका केली. देशात कोणताही मोदी फॅक्टर असताना देखील इथे तो चालला नाही. आता देखील येथे फक्त काँग्रेसचा फॅक्टर चालणार असा विश्वास व्यक्त केला.

# विजयासाठी ओमराजे निंबाळकर स्वामी समर्थांच्या चरणी साकडे



सोलापूर – श्री स्वामी समर्थांच्या कृपेनेच आपल्या सामाजिक व राजकीय सेवेची वाटचाल चालू आहे. यंदाही लोकसभा निवडणुकीच्या माध्यमातून स्वामी कृपेने आपल्याला पुन्हा एकदा लोकसेवेची संधी लाभावी याकरिता स्वामी समर्थांच्या चरणी साकडे घालून दर्शन घेतले असल्याचे मनोगत धाराशिव लोकसभा मतदारसंघ महाविकास आघाडीचे उमेदवार ओमराजे निंबाळकर यांनी व्यक्त केले.

ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी ओमराजे निंबाळकर यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सत्कार केला व आगामी निवडणुकीत निंबाळकर यांच्या यशाबद्दल शुभेच्छा व्यक्त केल्या. यावेळी बोलताना ओमराजे निंबाळकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, गिरीश पवार, रामचंद्र समाणे, विपुल जाधव, स्वामीनाथ मुमूडले, प्रसाद सोनार, अविनाश क्षीरसागर, सागर गोंडाळ, श्रीकांत मलवे इत्यादी उपस्थित होते.

# आ.आवताडे यांच्या माध्यमातून ग्रा.पं.सदस्य व अनेक कार्यकर्त्यांनी केला भाजपमध्ये प्रवेश

मंगळवेढा – ग्रामपंचायत शिरनांदगी या गावातील भालके गटाच्या ग्रामपंचायत सदस्य तसेच माजी ग्रामपंचायत सदस्य आणि कार्यकर्त्यांनी पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या नेतृत्वावर आणि कार्यपद्धतीवर विश्वास ठेवून ग्रामपंचायत सदस्य संतोष पाटील, काशीराम कोळेकर, रमेश ऐवळे, अतुल चोपडे व दत्ता वाघमोडे या ग्रामपंचायत सदस्यांनी व सामाजिक कार्यकर्ते यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला आहे. सदर प्रवेशामुळे मंगळवेढा तालुक्यातील भालके गटाला जोरदार धक्का बसला आहे.

सदरप्रसंगी आमदार आवताडे यांच्या हस्ते जनसंपर्क कार्यालय मंगळवेढा येथे सर्व नवप्रवेशित पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे स्वागत करण्यात आले. सोयीनुसार राजकारणातील भूमिका वेळोवेळी बदलणाऱ्या आणि कार्यकर्त्यांना कोणतीही राजकीय दिशा न देणारे भगीरथ भालके हे माजी दिवंगत आमदार स्व.भारत भालके यांच्या विचारांचा वारसा चालवण्यामध्ये असमर्थ राहिल्याने आम्ही सर्वांनी एकमुखाने हा निर्णय घेतला असल्याचे सर्व कार्यकर्त्यांनी यावेळी बोलून दाखवले.

भाजपा जिल्हा संघटन सरचिटणीस शशिकांत चव्हाण, विधानसभा अध्यक्ष राजेंद्र सुरवसे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सोमनाथ आवताडे, जिल्हा नियोजन समिती सदस्य प्रदीप खांडेकर, युवक नेते तानाजी काकडे, भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष सुदर्शन यादव, माजी उपसभापती सूर्यकांत ढोणे, जेष्ठ नेते यशवंत खताळ, युवक नेते शहाजी गायकवाड, माजी सरपंच पांडुरंग कांबळे, अंकुश खताळ, उपसरपंच महादेव खताळ, ग्रामपंचायत सदस्य अंकुश कसबे, राजू सुतार समाधान खांडेकर, नाथपंथी समाजाचे लक्ष्मण इंगवले, डॉ सहदेव खताळ, परमेश्वर खांडेकर, पांडुरंग जानकर, हरी लवटे आदी कार्यकर्ते उपस्थित होते..

# मराठा आरक्षण मिळेपर्यंत फेटा बांधणार नाही : सातपुते



सोलापूर – सोलापूर लोकसभा मतदारसंघाचे भाजप उमेदवार राम सातपुते नेहमी या ना त्या कारणाने चर्चेत असतात. सोलापूर जिल्ह्यात मोहोळ तालुक्यात प्रचारा दरम्यान गेले असता मराठा समाजाच्या तरुणांनी आरक्षणाबाबत प्रश्न विचारले. त्यावर रविवारी माध्यमांना माहिती देताना राम सातपुते यांनी जाहीरपणे सांगितले, जोपर्यंत मराठा समाजाला आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत डोक्यावर फेटा बांधणार नाही. राम सातपुतेच्या या वक्तव्यामुळे मराठा समाजात नवचैतन्य निर्माण झाले आहे.

भाजपचे उमेदवार राम सातपुते आणि काँग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे या दोन्ही उमेदवारांना मराठा समाजाच्या रोषास सामोरे जावे लागले. पंढरपूर तालुक्यातील सरकोली गावात काही दिवसांपूर्वी प्रणिती शिंदेना मराठा समाजाने जबरदस्त विरोध केला होता. प्रणिती शिंदे आणि मराठा तरुणांमध्ये शाब्दिक चकमक देखील झाली होती. ८ एप्रिल रोजी मोहोळ तालुक्यातील वडवळ गावात राम सातपुते जाण्याअगोदर मराठा समाज बांधवांनी कडाडून विरोध करत राम सातपुते यांची सभा होऊ दिली नाही. माजी खासदार डॉ. जय सिद्धेश्वर महाराज यांना देखील मराठा समाजातील तरुणांनी विरोध केला होता. सोलापूर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात मराठा समाज आजही चिडलेल्या अवस्थेत आहे. सोलापूर शहरात प्रचारादरम्यान राम सातपुते यांनी मराठा आरक्षणाबाबत मोठे वक्तव्य केले आहे. जोपर्यंत मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत डोक्यावर फेटा बांधणार नाही. लोकसभा निवडणुकीत जरी विजय झाला तरी डोक्यावर फेटा बांधणार नाही, असे वक्तव्य राम सातपुतेंनी केले आहे.

# नेहा हिरेमठ हिच्या हत्येच्या निषेधार्थ कॅन्डल मार्च, महिला मंडळाच्यावतीने आयोजन

सोलापूर – कर्नाटकच्या हुबळीतील सौंदत्ती येथील नेहा निरंजन हिरेमठ हिच्या हत्येच्या निषेधार्थ २२ एप्रिल रोजी सायंकाळी ६.३० वाजता ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर मंदिरापासून समाजातील महिला मंडळाच्यावतीने कॅन्डल मार्च काढण्यात आला.

नेहा ही लिंगायत जंगम समाजातील सुसंस्कारी, शांत, हुशार मुलगी म्हणून ओळखली जात होती. एक विकृत मनोवृत्तीचा तरुण तिच्या वर्गात शिकत होता. तो सतत तिच्या मागावर असायचा, अश्लील हावभाव करून तिला सतत त्रास देत होता हे कृत्य तिने तिच्या घरच्यांना सुद्धा सांगितले होते. तिच्या घरच्यांनी ह्या नराधमाला अनेकदा ताकीद देवुन सुद्धा नेहाच्या मनाविरूद्ध हा नराधम वागत होता. नेहा त्याला भिक घालत नाही. याचा राग मनात ठेवून ह्या नराधमाने नेहाचा खुन करून बळी घेतला. वीरशैव व्हिजनच्यावतीने सोमवारी सायंकाळी ६.३० वाजता श्री सिद्धरामेश्वर मंदिर येथून कॅन्डल मार्च काढण्यात येणार आला,

# लोकसभेच्या नादात आमदारकीही गेली आणि खासदारकीही गेली

## अमित देशमुखांचा राम सातपुतेंना टोला

पंढरपूर – लोकसभा उमेदवारीच्या नादात आमदारकीही गेली आणि खासदारकीही गेली. आता बीडचे पार्सल पुन्हा बीडला पाठवा, अशा शब्दात काँग्रेस नेते अमित देशमुख आणि सतेज पाटील यांनी राम सातपुते यांच्यावर टीका केली. आमदार प्रणिती शिंदे यांच्या प्रचारार्थ कासेगाव येथे सभेचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी भाजप उमेदवार सातपुते यांच्यावर सडकून टीका करण्यात आली.

सोलापूर लोकसभा मतदारसंघातील प्रचारही आता वेग धरु लागला आहे. आज कासेगाव येथे काँग्रेस उमेदवार प्रणिती शिंदे यांच्या प्रचारसभेत अमित देशमुख आणि सतेज पाटील या दोन नेत्यांनी भाजप उमेदवार राम सातपुते यांच्यावर सडकून टीका केली. बीआरएसमध्ये गेलेले नेते भगीरथ भालके यांनी काँग्रेस उमेदवार प्रणिती शिंदे याना पाठिंबा दिल्यानंतर पंढरपूर तालुक्यातील कासेगाव येथे प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी काँग्रेस नेते प्रकाश पाटील यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते. आपल्या खुमासदार भाषणात आमदार अमित देशमुख यांनी भाजप उमेदवार राम



सातपुते यांच्यावर सडकून टीका केली. ते विधिमंडळात होते पण खासदारकीला उभारले आणि आता खासदारकीही गेली आणि आमदारकीही गेली असा टोला अमित देशमुखांनी लगावला. आता बीडचे हे पार्सल बीडला परत पाठवायची वेळ आल्याचे ते म्हणाले.हाच धागा पकडत आमदार सतेज पाटील यांनी भाजप उमेदवार राम सातपुते यांच्यावर शेरेबाजी करताना हा जबरदस्तीने उभा केलेला उमेदवार आहे असा टोला लगावला. जो उमेदवार स्वतःच्या उमेदवारी अर्जावर सही करायचा विसरतो तो तुमचे भले काय करणार असा टोलाही सतेज पाटलांनी लगावला. ज्याला आपला उमेदवारी अर्ज भरता येत नाही, जो आपल्या अर्जावर सही विसरतो तो तुमच्या भविष्यकाळातील विकासावर काय सही करणार असा सवाल सतेज पाटलांनी केला. ज्याला उमेदवारी अर्ज भरता येत नाही तो आता लाखांच्या बाता करण्याचा प्रयत्न करत असल्याचे पाटील म्हणाले. आम्ही कोल्हापुरात जसे म्हणतो आमचे ठरलंय तसे सोलापूरकरांनी म्हणा की हे पार्सल बीडला पाठवायचे आहे असा टोलाही सतेज पाटलांनी लगावला

# देशाच्या सर्वांगीण विकासामध्ये नरेंद्र मोदींचे मोठे योगदान-सदाभाऊ खोत

पंढरपूर – देशाच्या सर्वच सर्व क्षेत्रांमध्ये आणि सामाजिक स्थैर्य उंचावण्याचे काम तसेच देशातल्या अनेक लोकांपर्यंत विविध योजना च्या माध्यमातून राष्ट्रनिर्मिती चे कार्य करून देशाच्या सर्वांगीण विकासामध्ये नरेंद्र मोदी चे मोठे योगदान असल्याचे मत मा.राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांनी व्यक्त केले.

करकंब येथे रयत क्रांती संघटनेच्या वतीने महायुती चे उमेदवार खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.यावेळी प्रा.सुहास पाटील,रयत क्रांती संघटनेचे प्रदेशाध्यक्ष दिपक भोसले,मा .जि.प.सदस्य बाळासाहेब देशमुख,पं.स.सदस्य राहुल पुरवत, भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष सुरेश उर्फ भाऊसाहेब अंबुरे,भा.ज.पा. चे कामगार आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष मनोज पवार, रयत क्रांती संघटनेचे संयोजक तथा जिल्हा उपाध्यक्ष नंदकुमार व्यवहारे,भा.ज.पा.ता.सरचिटणीस लक्ष्मण वंजारी, बाळासाहेब ठाकरे शिवसेना तालुका उपप्रमुख विजय माळी,भा.ज.पा. शहर अध्यक्ष बंडू कुलकर्णी,संतोष शिंगटे सर ,गा.पं.सदस्य बापू शिंदे, मुस्तफा बागवान, मारुती ठोंबरे, नवनाथ नलवडे, विकास घाटुळे , भैय्या वागज,पोपट जाधव सुरज व्यवहारे,आदीसह बहुसंख्य पदाधिकारी कार्यकर्ते व शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी उपस्थित महायुतीच्या सर्वच पदाधिकाऱ्यांनी माढा लोकसभेचे उमेदवार खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना निवडून होण्यासाठी एकत्रितपणे होम



टू होम प्रचारावर भर देण्यासाठी काम करणार असल्याचे सांगितले.